मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# डुडुळगाव- किवळेतील "घरकुलाचे स्वप्न" होणार साकार!

## आमदार महेश लांडगे यांच्या मागणीला यश ; प्रधानमंत्री आवास योजना, सोमवारी होणार सोडत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील डुडूळगाव व किवळे येथील घरकुल प्रकल्पांच्या संगणकीय सोडतीला अखेर मुहूर्त मिळाला आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्याला अखेर त्यांच्या मागणीला यश मिळत असून, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत या दोन्ही प्रकल्पांची सोडत सोमवारी, दि. १५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता नटसम्राट निळू फुले रंगमंदिर, पिंपळेगुरव येथे पार पडणार आहे.



महापालिकेने केंद्र व राज्य शासनाच्या सहकार्याने डुडूळगाव येथे १ हजार १९० तर किवळे येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ७५५ सदनिकांची उभारणी केली आहे. या प्रकल्पांसाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले होते. त्यातील पात्र अर्जांची छाननी पूर्ण झाली असून आता संगणकीय सोडत प्रक्रियेचे औपचारिक आयोजन केले जात आहे. कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण महापालिकेच्या अधिकृत फेसबुक व युट्यूब चॅनेलवर उपलब्ध असेल, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी दिली.

> "डुडूळगाव आणि किवळे येथील घरकुल प्रकल्पांची सोडत लवकरात लवकर व्हावी, यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा केला. अखेर ही मागणी मान्य होऊन 2 हजार कुटुंबांच्या डोक्यावर स्वतःच्या घराचे छत उभे राहणार आहे, ही आमच्यासाठी आनंदाची आणि समाधानाची बाब आहे. सामान्य नागरिकांचे स्वप्न पूर्ण करणाऱ्या या उपक्रमासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणीवस यांच्यासह महापालिका प्रशासन व शासनाचे मी मनःपूर्वक आभार मानतो.
>
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

आमदार महेश लांडगे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा, बैठका आणि शासन-प्रशासनाशी झालेल्या चर्चेमुळे अखेर हा महत्त्वाचा टप्पा गाठला गेला असून हजारो कुटुंबांचे घरकुलाचे स्वप्न आता प्रत्यक्षात उतरणार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी पिंपरी-चिंचवड शहरात होत असून, आतापर्यंत सुमारे 19 हजाराहून अधिक सदनिकांची निर्मिती करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, आगामी काळात शहर झोपडपट्टी मुक्त आणि प्रत्येकाला हक्काचे घर मिळावे, असा संकल्प करण्यात आला आहे.

---

# एकजूट, समर्पण अन् लोकसंपर्कातून भाजपाचा विजय निश्चित!

## पिंपरी-चिंचवड भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांचा कार्यकर्त्यांना विश्वास

**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी महापालिका निवडणुकीत पक्षाची-कार्यर्त्यांची "एकजूट, समर्पण आणि सततची लोकसंपर्क मोहीम आणि विकासकामांच्या बळावर भाजपाचा विजय अटळ आहे," असे ठाम वक्तव्य शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी केले.



भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते, देशाचे माजी ग्रामविकास मंत्री व राज्याचे लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त शहर भाजपाच्या वतीने "कार्यकर्ता एकत्रिकरण मेळावा" उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस स्व. मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष काटे बोलत होते.

शहर भाजपाच्या वतीने आयोजित मेळाव्यात सुरुवातीला स्व. मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शहर कार्यकारिणीचा विस्तार जाहीर करत अनेक कार्यकर्त्यांना उपाध्यक्ष, सचिव अशा विविध पदांवर नियुक्त करण्यात आले. घोषणेनंतर सभागृहात उपस्थित कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त करत टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.

शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या कार्याचे स्मरण करून सांगितले की, "मुंडे साहेबांचे व्यक्तिमत्त्व हे कार्यकर्त्यांसाठी प्रेरणागौरव आहे. त्यांच्या आदर्शांवर चालतच आपण भाजपाला घराघरांत पोहोचवू शकतो." आगामी महापालिका निवडणुकीकडे कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे आणि संघटित प्रयत्नांतून प्रचंड मताधिक्याने पक्षाला विजय मिळवून द्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

> "एकजूट आणि कटिबद्धतेतच आमचे सामर्थ्य आहे. प्रत्येक कार्यकर्त्याचा समर्पण आणि मेहनतच भाजपाला विजयी बनवते. आपण एकत्र काम करून, स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या आदर्शांवर चालत, समाजाच्या सेवेसाठी नेहमी पुढे राहूया. प्रत्येक घरात भाजपाचे विचार पोहोचविणे आणि शहराला यशाच्या शिखरावर पोहोचवणे हेच आमचे उद्दिष्ट आहे.
>
> - शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

मेळाव्यास संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस वेशाली खाड्ये, मधुकर बच्चे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशीव खाडे, माजी उपमहापौर केशव घोळवे, माजी उपमहापौर सचिन चिंचवडे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, माजी नगरसेवक योगीता नागरगोजे, माउली थोरात, राजू दुर्गे, महेश कुलकर्णी, कुणाल लांडगे, मंडल अध्यक्ष गणेश ढोरे, हर्षद नढे, संजय मंगोडीकर यांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून कार्यकर्त्यांनी मुंडे साहेबांच्या आदर्शांवर चालत संघटना अधिक मजबूत करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# 'होम मिनिस्टर' कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

## सारिका शरद भालेकर यांच्यातर्फे आयोजन; महिलांचा सन्मान व सहभाग ठरला केंद्रबिंदू

**पिंपरी | प्रतिनिधी**

महिलांना सन्मानित करण्याच्या आणि त्यांच्या कौशल्यांना वाव देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या 'होम मिनिस्टर' या विशेष कार्यक्रमाला येथील महिलांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. या कार्यक्रमास महिलांचा अभूतपूर्व आणि उत्स्फूर्त प्रतिसाद लाभल्याने आयोजक सारिका शरद भालेकर यांनी समाधान व्यक्त केले आहे. मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन रुपीनगर तळवडे येथील महिलांनी याचा लाभ घेतला.

महिलांचा उत्साह केवळ सहभागातच नव्हे तर बक्षिसेही जिंकली. कार्यक्रमात विजेत्या महिलांना स्कूटर, वॉशिंग मशीन, शिवण यंत्र, व किटली-मिक्सर-तवे यांसारखी आवश्यक घरगुती उपकरणे तसेच आकर्षक पैठणी साड्या देऊन सन्मानित करण्यात आले. फॉर्म जमा करण्यापासून ते कार्यक्रमाच्या शेवटच्या क्षणापर्यंत महिलांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. विविध स्पर्धा आणि लकी ड्रॉमध्ये आपल्या नशिबाची परीक्षा पाहण्यासाठी महिलांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. उपस्थित महिलांनी हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असल्याचे सांगून, कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल सारिका शरद भालेकर यांचे मनःपूर्वक आभार मानले.




> होम मिनिस्टर कार्यक्रमाला मिळालेला प्रतिसाद अभूतपूर्व होता. रुपीनगर तळवडे येथील महिला मोठ्या संख्येने यामध्ये सहभागी झाल्या होत्या. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने कायमच महिलांना समान संधी आणि व्यासपीठ मेळावा यासाठी प्रयत्न केले आहे. आज या माध्यमातून आम्हाला महिलांसाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देता आले याचे समाधान आहे.
>
> **- सारिका शरद भालेकर**

# चिखली-आकुर्डी रस्ता रुंदीकरण रखडले, वाहतुक कोंडीत भर

## अतिक्रमण कारवाई केली, रस्ता रुंदीकरण कधी? नागरिकांचा सवाल; वाहतूक कोंडीमुळे वाहनचालक त्रस्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

साने चौकापासून ते चिखली-आकुर्डी रस्ता, म्हेत्रेगार्डन रस्ता नेवाळे वस्ती या ठिकाणी होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक, वाहनचालक त्रस्त झाले आहेत. चिखली-आकुर्डी रस्त्यावर महापालिका प्रशासनाने कारवाई केली, मग रस्ता रूंदीकरण कधी करणार, वाहतूक कोंडी कधी सूटणार असे सवाल नागरिकांकडून केले जात आहेत. तसेच रस्ता रूंदीकरण करेपर्यंत वाहतूक कोंडी सुरुळीत करण्यासाठी वाहतूक पोलिस सायंकाळच्या वेळी नेमण्यात यावे अशी मागणीही करण्यात येत आहे.

चिखली-आकुर्डी हा रस्ता चिखली गावठाण परिसरापासुन गणेश नगर,नेवाळे वस्ती, साने चौक,कृष्णा नगर या रहिवाशी क्षेत्राचा मुख्य रस्ता असुन या रस्त्यालगत हजारो नागरिकांचे वास्तव्य आहे.हा परिसर शहरातील दाट लोकवस्तीचा परिसर म्हणून ओळखला जातो. या रस्त्याच्या रूंदीकरणासाठी काही महिन्यांपूर्वी महापालीका प्रशासनाकडून अतिक्रमणे काढण्यात आली,मात्र अतिक्रमणे काढूण देखील रस्ता रूंदीकरण रखडले असल्याने नागरीकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. या रस्त्यावर अनाधीकृत रित्या सायंकाळच्या वेळी अनेक विक्रेते आपले व्यवसाय थाटतात,या मुळे सध्या असलेला रस्ता अरूंद होतो व वाहतुक कोंडी निर्माण होते. अनाधीकृत रित्या रस्त्यावर दुकाने लावून व्यवसाय करणाऱ्या व्यवसायीकांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिकांकडुन करण्यात येत आहे.

रस्ता रूंदीकरण रखडलेले, अनधिकृत व्यावसायिकांकडून पदपथांवर केलेले अतिक्रमण,बेशिस्त वाहन पार्किंग,रस्त्यावरील खड्डे, वर आलेले चेंबर यामुळे वाहतूक मंदावली जाते. मुख्य दुकानासमोरील पार्किंगच्या जागेत छोटे व्यावसायिक दुकाने थाटतात, वाहतूक पोलिस प्रशासनाचे दुर्लक्ष यामुळे वाहतूक कोंडी नित्याचीच डोकेदुखी ठरत आहे.



> या रस्त्यावरील वाहतूक कोंडी नियंत्रित करण्यासाठी वाहतुक विभागाकडून पार्किंग साठी मार्किंग करण्यात आलेली आहे,नागरीकांनी शिस्तीचे पालन करणे गरजेचे आहे. वाहतूक कोंडी सुरुळीत ठेवण्यासाठी आमचे वाहतूक पोलिस लक्ष देतील.
>
> **- रामचंद्र घाडगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तळवडे वाहतूक विभाग.**

> महापालीका प्रशासन व वाहतुक विभागाच्या समन्वयाने ही समस्या सोडवणे गरजेचे आहे,या परिसरातील लोकवस्ती व बाजार पेठ लक्षात घेता योग्य पार्कींग सुविधा व पथारी विक्रेत्यांसाठी हॉकर्स झोनची निर्मीती करणे गरजेचे असल्याचे स्थानिक व्यवसायीक व नागरीकांकडून सांगण्यात येत आहे.
>
> **- राहूल सर्जेराव भोसले, युवा नेते.**

> 'चिखली- आकुर्डी रस्त्याचे रूंदीकरण रखडले नसुन, त्या संदर्भातील अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे वरिष्ठ पातळीवरून तांत्रिक बाबींची पडताळणी होऊन मंजुरी मिळताच काम चालु केले जाईल.' त्यासाठी काही कालावधी लागेल.
>
> **- शिवाजी चौरे, कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग.**

> चिखली- आकुर्डी रस्त्यावरील अतिक्रमण कारवाई केली मग २४ मीटर रस्त्याचे काम सुरु करणे आवश्यक होते. त्यासाठी कोणाचा विरोध नाही. वाहतूक कोंडी सुरुळीत करण्यासाठी मुख्यवेळी वाहतूक पोलिस कायम असणे आवश्यक आहे. यासाठी मागणीही केलेली आहे.
>
> **- यश साने, युवा नेते.**

# पुणे महानगर क्षेत्रात 220 प्रकल्पांची कामे; 32 हजार 523 कोटींचा निधी मंजूर...

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती, पुणे महानगर नियोजन समितीची पाचवी सभा संपन्न

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील वाढते नागरीकरण लक्षात घेता शहरवासीयांना नागरी सोयी-सुविधा देण्यास राज्य शासनाचे प्राधान्य आहे. पुणे शहराचा विस्तारही मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्या अनुषंगाने पुणे महानगर क्षेत्रात 220 प्रकल्पांतर्गत विविध विकासकामे हाती घेण्यात आली असून त्यासाठी 32 हजार 523 कोटींचा निधी मंजूर करण्यात आल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. रस्ते विकास नियोजनानंतरच शहर विकासाचे आराखडे तयार करावेत, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

पुणे महानगर नियोजन समितीच्या पाचव्या सभेचे आयोजन (दि.११) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनातील मंत्रीपरिषद सभागृहात करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, आमदार तानाजी सावंत, सुनील शेळके, सिद्धार्थ शिरोळे, शंकर मांडेकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पुणे महानगरसाठी विहित कालमर्यादेत 'स्ट्रक्चर प्लॅन' तयार करताना त्यामध्ये भविष्यातील वाढणारी लोकसंख्या, नागरीकरण यांचा विचार करण्यात यावा. प्लॅन तयार करण्याची कार्यवाही गतीने पूर्ण करावी. विकासाचे नियोजन करताना विविध प्राधिकरणांकडे काही क्षेत्रांच्या विकासाची जबाबदारी न देता संपूर्ण क्षेत्राचा विकास एकाच प्राधिकरणाने करावा, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

पुणे महापालिकेत 30 जून 2021 मध्ये समाविष्ट झालेल्या 23 गावांचे विकास नियोजन पुणे महापालिकेने करावे. पुणे ग्रोथ हबसाठी विकास आराखडा शासनाच्या मित्रा संस्थेकडून करण्याबाबत पडताळणी करावी, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले. पुणे शहरामध्ये माण-म्हाळुंगे टाऊनशिप प्लॅनिंग योजनेचे काम गतीने पूर्ण करावे. शहरामध्ये एकीकृत टाउन प्लॅनिंगच्या 15 योजनांवर काम सुरू असून यामध्ये कालमर्यादा निश्चित करण्यात यावी. वेळेत योजना पूर्ण झाल्यास त्याचा लाभ सर्वांना होतो, त्यामुळे कुठेही विलंब न लावता या योजनांची कामे पूर्ण करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

पुणे विद्यापीठ जवळील उड्डाणपुलाच्या लोकार्पणाची वाट न बघता नागरिकांच्या सेवेसाठी तो सुरू करावा. पुणे महानगर समितीच्या सर्व सदस्यांसमवेत कार्यक्रमाचे आयोजन करावे, त्यामध्ये सर्वांची मते जाणून घेत पुणे शहरासाठी भविष्याचा वेध घेणारा 'कॉम्प्रेहेन्सिव्ह मोबिलिटी प्लॅन' तयार करण्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी निर्देशित केले.



### पुणे महानगर प्रदेशात सुरू असलेली विकासकामे....

» पुणे महानगरात 589 किलोमीटर लांबीच्या रस्त्याची 127 कामे सुरू, शहरांतर्गत 83 किलोमीटर लांबीचा वर्तुळाकार रस्ता प्रकल्प, पुणे शहराअंतर्गत विकास केंद्र, औद्योगिक क्षेत्र, विमानतळ जोडणीसाठी रस्त्यांची कामे सुरू, पूल आणि उड्डाणपुलाची तीन कामे सुरू, गृहनिर्माण प्रकल्पांची तीन कामे, पाणीपुरवठा योजनांचे चार कामे सुरू असून वाघोली पाणीपुरवठा योजना पूर्ण झाली आहे.

### पुणे महानगरात सुरू होणारी कामे...

» पवना, इंद्रायणी, मुळा व मुठा नद्यांच्या पुनरुज्जीवनाची तीन कामे, चौकांमधील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी 17 कामे, 10 पर्यटन विकास केंद्रांची कामे, स्कायवॉक, मल्टी मॉडेल हब प्रकल्पाची पाच कामे लवकरच सुरू होणार आहेत.

### येरवडा ते कात्रज भुयारी मार्ग...

» येरवडा ते कात्रज दरम्यान 20 किलोमीटर लांबीचा भुयारी मार्ग प्रस्तावित करण्यात आला आहे. या महामार्गाच्या फिजीबिलिटी पडताळणीचे काम सुरू असून यासाठी अंदाजित 7 हजार 500 कोटी रुपयांची निधी लागणार आहे.

# महापालिकेत कर्मचाऱ्यांची दिवाळी! एकाच दिवशी 600 जणांना पदोन्नती, 632 वारसांना थेट नोकरी

## पदोन्नती आणि नियुक्त्या पारदर्शक पद्धतीने; आयुक्तांच्या निर्णयावर अधिकारी, कर्मचारी आणि वारस कुटुंबीयांनी व्यक्त केले

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या विविध विभागांत कार्यरत असणाऱ्या २९ अधिकाऱ्यांसह एकूण ६०० अधिकारी व कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचे आदेश देण्यात आले, तसेच अनुकंपा तत्त्वानुसार आणि लाडे पागे समितीच्या शिफारशीनुसार ६३२ वारसांची नियुक्ती करण्यात आली. महापालिकेचे आयुक्त नवलकिशोर राम व अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांच्या उपस्थितीत पदोन्नती समितीची बैठक झाली.

बैठकीत आयुक्तांनी २०२५-२६ मधील पदोन्नती प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेतला. मुद्रालय, नगरसचिव व अभियांत्रिकी संवर्गातील पदोन्नतीचे आदेश देण्याबरोबरच अनुकंप व लाडे पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसांना नियुक्तीची आज्ञापत्रे देण्यात आली. महापालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच एकाच दिवशी एवढ्या मोठ्या प्रमाणात पदोन्नत्ती, तसेच वारस नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

विशेष म्हणजे गेली अनेक वर्षे या पदोन्नत्या वेगवेगळी कारणे देत रखडल्या होत्या.पदोन्नतीमध्ये वर्ग १ मध्ये २९, वर्ग २ मध्ये १५६, तर वर्ग ३ मध्ये ४१५ कर्मचाऱ्यांचा समावेश असून, एकूण ६०० जणांना पदोन्नती मिळाली आहे. लाडे पागे समितीच्या शिफारशीनुसार ५६२ जणांना, तर अनुकंपा तत्त्वानुसार ७० वारसांना नियुक्ती देण्यात आली.पदोन्नती व नियुक्त्या पारदर्शक पद्धतीने करण्यात आल्याचे आयुक्त नवलकिशोर राम यांनी सांगितले.

महापालिकेच्या विविध विभागांत कार्यरत असणाऱ्या २९ अधिकाऱ्यांसह एकूण ६०० अधिकारी व कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचे आदेश देण्यात आले, तसेच अनुकंपा तत्त्वानुसार आणि लाडे पागे समितीच्या शिफारशीनुसार ६३२ वारसांची नियुक्ती करण्यात आली. अधिकारी, कर्मचारी, तसेच अनुकंप आणि लाडे पागे समितीच्या शिफारशीनुसार नोकरी मिळालेल्या वारसांच्या कुटुंबीयांनी महापालिका आयुक्तांच्या या निर्णयाबाबत समाधान व्यक्त केले.




### निर्णयाबाबत समाधान व्यक्त

» कर्मचाऱ्यांच्या कार्याचा योग्य गौरव करणे आणि प्रशासकीय कार्यक्षमता वाढविण्यास महापालिका प्राधान्य देते, असे ते म्हणाले.काही पदांवरील पदोन्नती अनेक वर्षांनंतर झाल्यामुळे अधिकारी, कर्मचारी, तसेच अनुकंप आणि लाडे पागे समितीच्या शिफारशीनुसार नोकरी मिळालेल्या वारसांच्या कुटुंबीयांनी महापालिका आयुक्तांच्या या निर्णयाबाबत समाधान व्यक्त केले.

# आठ महिन्यांच्या थरारानंतर पुणे विमानतळावरील बिबट्या अखेर जेरबंद!

## 80 फूट खोल बोगद्यात अचूक कारवाई; आफ्रिकन-ऑस्ट्रेलियन तज्ज्ञांचे प्रशिक्षण ठरले गेमचेंजर

**पुणे | प्रतिनिधी**

28 एप्रिल पासून पुणे विमानतळ परिसरात अधूनमधून दिसणारा एक प्रौढ नर बिबट्या 11 डिसेंबर रोजीN अखिल अखेर तब्बल आठ महिन्याच्या प्रयत्नानंतर पुणे वनविभागाच्या नेतृत्वाखाली, रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट आणि भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या यांच्या संयुक्त मोहिमेद्वारे सुरक्षितरीत्या बेशुद्ध करून पकडण्यात आला. आठवडाभरापूर्वीच आफ्रिकन आणि ऑस्ट्रेलियन तज्ञांनी वनविभागाच्या 40 अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले होते त्या प्रशिक्षणात बिबट्या च्या हालचालींवर लक्ष देऊन त्याचा डेटा गोळा करण्यात आला त्यातूनच ही मोहीम संयुक्तरीत्या राबवण्यात आली त्याचेही यश असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

लोहगाव विमानतळाचा परिसर प्रचंड मोठा आणि विस्तीर्ण असून त्या ठिकाणी लपण्यास मोठी जागा आहे अनेक ठिकाणी उंच सखल भाग असून छोट्या छोट्या गुहा देखील या ठिकाणी आहेत. त्या गुहांचा सर्वे करून त्या ठिकाणी जाळ्या बसवण्यात आल्या होत्या. वनविभागाचे अधिकारी, विमानतळ प्राधिकरणाचे अधिकारी आणि रेस्क्यू या खाजगी संस्थेचे लोक या ठिकाणी गेल्या अनेक महिन्यापासून सापळा लावून होते.विमानतळावर तब्बल 15 एरियल कॅमेरे लावण्यात आले होते तर तीन पेक्षा जास्त सापडे लावण्यात आले होते. वातावरणातला प्रचंड गारठा आणि कमी झालेली वर्दळ अशा अवस्थेत हा बिबट्या वारंवार दिसत होता. शेवटी गुरुवारी रात्री मध्यरात्री आणि शुक्रवारच्या पहाटे हा बिबट्या एका सखल भागातील जाळीत अलगद अडकला आणि वनविभागाच्या अधिकाऱ्यांना तो तब्बल आठ महिन्यानंतर पकडल्याचा आनंद झाला.

4 डिसेंबर 2025 रोजी, निरीक्षणातून बिबट्या पुन्हा भूमिगत बोगद्यात गेल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर सर्व संभाव्य बाहेर पडण्याचे मार्ग बंद व मजबूत करण्यात आले, अतिरिक्त थेट निरीक्षण करणारे कॅमेरे बसवण्यात आले आणि बोगद्याच्या आतील हालचाली अधिक अचूकपणे समजण्यासाठी कॅमेरा ट्रॅपचे पुनर्स्थापन करण्यात आले. ही यशस्वी मोहीम दीर्घकाळ चाललेल्या आणि तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक प्रयत्नांचा यशस्वी शेवट ठरली असून, संवेदनशील नागरी परिसरात पुराव्यावर आधारित, नियोजित आणि समन्वयित वन्यजीव व्यवस्थापनाचे महत्व अधोरेखित करते.



### प्रौढ नरबिबट्या ,24 तास देखरेखि खाली ठेवणार...

» हा नरबीपट्या असून प्रौढ आहे त्याला तपासणीसाठी वनविभागाने 24 तास केंद्रात ठेवण्याचा निर्णय घेतला असून त्याची वैद्यकीय तपासणी लवकरात करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. बिबट्या 28 एप्रिल 2025 रोजी प्रथम आढळला. पुढील काही महिन्यांत त्याने विमानतळ परिसरातील भूमिगत बोगदे, दाट झुडपे आणि कमी मानवी हालचाली असलेल्या भागांचा वापर करून आत-बाहेर हालचाल चालू ठेवली. विमानतळाचा विस्तृत आणि संवेदनशील परिसर लक्षात घेता, त्याला पकडण्याच्या प्रयत्नांना अनेक गंभीर तांत्रिक आणि सुरक्षा विषयक अडचणींचा सामना करावा लागला. कॅमेरा ट्रॅप, लाईव्ह कॅमेरे आणि पिंजरे यांद्वारे सातत्याने निरीक्षण ठेवण्यात आले,

### असा सापडला बिबट्या जाळ्यात..

» या निरीक्षणांच्या आधारे, 11 डिसेंबर 2025 रोजी सुमारे 30 सदस्यांच्या संयुक्त पथकाने एक केंद्रित योजना राबवली. वनविभाग, रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट आणि आणि भारतीय हवाई दलाचे अधिकारी या पथकांनी समन्वय साधून बिबट्याला अंदाजे 80 फूट लांबीच्या बोगद्यात नेण्याची मोहीम आखली, जेणेकरून नियंत्रित परिस्थितीत त्याला शांततामयरीत्या बेशुद्ध करता येईल.अत्यंत मर्यादित जागा असूनही, वन्यजीव वैद्यक तज्ञ डॉ. गौरव मंगला यांनी बिबट्याला यशस्वीपणे डार्ट मारून बेशुद्ध केले. बिबट्याला त्यानंतर बोगद्यातून सुरक्षित बाहेर काढून वैद्यकीय निरीक्षणासाठी हलवण्यात आले.

### मानव आणि वन्यजीवांच्या सुरक्षिततेला प्राधान्य

» रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्टच्या च्या संस्थापक आणि अध्यक्ष नेहा पंचमिया म्हणाल्या, प्रत्येक वन्यजीव वेगळी असते आणि निर्णय घाईने नव्हे तर परिस्थिती, वेळ आणि योग्य रणनीतीवर आधारित असावेत. डेटा, तंत्रज्ञान आणि पथकाचा सक्षम समन्वय यामुळे मानव आणि वन्यजीवांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणारे परिणाम शक्य होतात.

# एनएसाठी 25 एकर जमिनीची मर्यादा कमी करा : आमदार राहूल कुल यांची अधिवेशनात मागणी

## 'धारण जमिनींचे एकत्रीकरण' विधेयकावर आमदार कुल यांचे मत; 'एनए' मर्यादा 25 एकरवरून 5 किंवा 3 एकर करण्याची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**


महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यात प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५ वर दौंडचे आमदार राहुल कुल यांनी हिवाळी अधिवेशनात मत मांडले. त्यांनी नागरिकांच्या गरजा आणि शहरांच्या नियोजित विकासाचे आव्हान यावर लक्ष केंद्रित करत, महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले.

ते म्हणाले, नियमितीकरण आणि सीपीआर नियमांमधील सुसंवाद आवश्यक आहे. गरजेपोटी झालेले बेकायदेशीर जमिनीचे व्यवहार नियमित करण्याचा सरकारचा निर्णय नागरिकांना मोठा दिलासा देणारा आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, नियमित झालेल्या जमिनींवर लोकांना भविष्यात घरे बांधता यावीत यासाठी, स्थानिक सीपीआर नियमांमध्ये तातडीने सुसंवाद साधण्याची मागणी केली.

पुणे जिल्ह्यासारख्या झपाट्याने नागरीकरण होत असलेल्या ठिकाणी, लोक रहिवासी गरजा पूर्ण करण्यासाठी '११ लोकांचे एक ७/१२' अशा पळवाटा काढत आहेत. सध्या शेती क्षेत्राच्या ठिकाणी एनए (अकृषिक जमिनी) करण्यासाठी २५ एकर क्षेत्राची मर्यादा आहे, जी अव्यवहार्य आहे. लोकांच्या गरजेनुसार ही 'एनए' (अकृषिक जमिनी) करण्याची मर्यादा ५ एकर किंवा ३ एकरपर्यंत कमी करावी, अशी मागणी त्यांनी केली.

ही मर्यादा कमी करतानाच, संबंधित भागांमध्ये रस्ते, गटारे आणि इतर नागरी व्यवस्था पुरवण्याची काळजी सरकारने घेतली पाहिजे, जेणेकरून शहरांचा विकास नियोजित होईल. घर नसलेल्या नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी घरे नियमित करण्याचा विभागाचा निर्णय स्तुत्य आहे. सरकारी जमीन किंवा इतर 'गायरान शिवायच्या' जमिनींवरील घरे नियमित झाली तरी, न्यायालयीन निर्णयामुळे प्रलंबित असलेल्या गायरान जमिनींवरील घरांचा त्वरित विचार करण्याची विनंती त्यांनी केली.





### हजारो गरजू लोकांना दिलासा मिळू शकेल

» ग्रामविकास विभाग, महसूल विभागाने एकत्रित येऊन एकात्मिक नियोजन केल्यास, हजारो गरजू लोकांना दिलासा मिळू शकेल, असे मत त्यांनी मांडले.आमदार राहुल कुल यांनी मांडलेल्या या मुद्द्यांमुळे, बेकायदेशीर जमीन व्यवहारांना नियमित करूनही नियोजित विकासाची दिशा कशी राखता येईल, यावर सभागृहात चर्चा झाली.